MHLA160000772009

**नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९**
**शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर**

### –:: नि.क्र.१ लगत आदेश ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सन्माननीय उच्च न्यायालय यांनी प्रकरण पाच महिन्याच्या आत निकाली काढण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्याप्रमाणे जवळपास एक महिना दहा दिवसाचा कालावधी संपलेला आहे. वादीला सदर आदेशाची माहिती असताना सुध्दा ती हजर झाली नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने मी वादीला कोर्ट मोशनद्वारे नोटीस काढली होती. ती वादीवर बजावलेली आहे. वादीचे अधिवक्ता श्री. व्ही.एन. संकाये हे हजर झाले. परंतु वादीने पुरावा दिलेला नाही. सन्माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये दोन्ही पक्षकारांनी विनाकारण प्रकरण तहकूब करू नये याबाबत आदेशित केलेले आहे. तरीसुध्दा वादी ही साक्षीदारांना हजर करून दावा चालविण्यास तयार नाही असे दिसून येते. सबब दावा हा वादीच्या कसुरानिशी खारीज होण्यास पात्र आहे. त्याकरिता तो पुढील तारखेला नेमण्यात येतो.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.11.24 17:42:25 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २४–११–२०२५**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**